रघुवीर का नया उपक्रम
श्याम चौक, अम.
लॉन्चींग बेस्ट ऑफर
शुद्ध शाकाहारी भोजन | चायनीज फुड
पनीर बटर मसाला
पनीर भुर्जी 190 100
कडई पनीर
दाल तडका
वेज कोल्हापुरी
वेज मन्चुरियन
वेज नुडल्स
सेजवान नुडल्स
पनीर पिझ्झा
बर्गर
सिर्फ पार्सल सुविधा उपलब्ध
अधिक जानकारी के लिए स्कॅन करें
रघुवीर श्याम चौक एवंम ZOMATO, SWIGGY M. 8500037000, 7070706770

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

हिंदुस्थान

७६ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com

अत्याधुनिक फर्निचर व गिफ्ट आर्टिकल्स चे सर्वांग सुंदर दालन
Nilkamal | श्री | BAJAJ FINSERV
अंबीयन्स फर्निचर अँड इंटेरियर मॉल
सोमवार बंद
सोफा सेट | बेडरुम सेट | टि टेबल, मंदिर
डायनिंग टेबल | ऑफिस फर्निचर | स्टिल अलमारी | गिफ्ट आर्टिकल्स
एकनाथपुरम, शंकर नगर, अमरावती Ph.0721-2677002

■ वर्ष ७६ वे/अंक १६९ वा ■ ■ अमरावती, बुधवार, दिनांक ४ फेब्रुवारी २०२६ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर १६ माघ १९४७ ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.००

किलो प्रमाणे मिळेल
ग्रिन नेट चे होलसेल विक्रेता
९९९ च्या खरेदरवर आकर्षक उपहार मोफत
सागर प्लास्टिक 100% होलसेल भावात
प्रो. प्रा. आकाश प्रकाशराव शिरभाते
मल्टी मॉल
चिन्ना चौक, फुटाणा लाईन, अमरावती
इस से सस्ता और अच्छा कही नही
8184057777
9822032885
ग्रिन नेट चे होलसेल विक्रेता
किलो प्रमाणे मिळेल
९९९ च्या खरेदरवर आकर्षक उपहार मोफत

काँग्रेसचे सात, माकपचा एक खासदार निलंबित

भारत-चीन वादावरुन गोंधळ, अध्यक्षांच्या दिशेने कागद भिरकावले

नवी दिल्ली दि. ३ : अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीही लोकसभेत मोठा गोंधळ झाल्याचं पाहायला मिळालं. भारत-चीन वादाचा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर सत्ताधारी आणि विरोधकांकडून गोंधळ घालण्यास सुरूवात झाली. त्यानंतर काँग्रेसच्या काही खासदारांनी पीठासन सभापतींच्या दिशेने कागद भिरकावले. त्यामुळे पीठासन सभापतींनी काँग्रेसच्या सात आणि माकपच्या एका खासदाराला अधिवेशनाच्या कार्यकाळापर्यंत निलंबित केलं.

कुणाला निलंबित करण्यात आलं?

गुरदीप सिंह औजला, मणिकम टागोर, अमरिंदर सिंह राजा वारिंग, किरण कुमार रेड्डी, हिबी ईडन, डीन कुरियाकोस, प्रशांत पडोले, एस वेंकटेशन - माकपा

भारत चीन वादावरुन संसदेत गोंधळ

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी राष्ट्रपतींच्या धन्यवाद प्रस्तावावर बोलताना पूर्व लष्कर प्रमुख एमएम नरवणे यांच्या न प्रकाशित झालेल्या पुस्तकाचा दाखला दिला. त्यावरुन मोठा गोंधळ निर्माण झाला. भारत आणि चीनच्या लष्करादरम्यान गलवान खाडीमध्ये झालेल्या वादावर त्या पुस्तकात नरवणे यांनी त्यांचं मत मांडलं आहे. परंतु, सत्ताधाऱ्यांनी राहुल गांधी यांच्या या मुद्द्याला विरोध केला. त्यानंतर झालेल्या गोंधळामुळे संसदेचं कामकाज तहकुब करण्यात आलं.

दुसऱ्या दिवशीही हा वाद सुरूच राहिल्याचं दिसून आलं. लोकसभेची *(उर्वरीत पान २ वर)*

सरकारी अधिकाऱ्यांच्या मनमानी उधळपट्टीला फडणवीस यांचा लगाम

मुंबई दि. ३ : राज्याच्या वित्त विभागाची सूत्रे हाती घेताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या तिजोरीवर पडणारा ताण लक्षात घेऊन काटकसरीचे धोरण स्वीकरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार येत्या १५ फेब्रुवारीपासून सरकारच्या विविध विभागात होणाऱ्या मनमानी खरेदीला चाप लावण्याचे आदेश फडणवीस यांनी दिले आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे काही दिवसांपूर्वीच अपघाती निधन झाले. पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्रीपदी निवड करण्यात आली असली तरी त्यांच्याकडे वित्त विभागाची जबाबदारी देण्यात आलेली नाही. सुनेत्रा पवार असून सरकारमध्ये रुळल्या नसून अर्थसंकल्प तयार करण्याची प्रक्रिया जटील असते. त्यांना याचा पुरेसा अनुभव नसल्यामुळे राष्ट्रवादीच्या नेत्यांशी चर्चा करुनच वित्त विभाग आपल्याकडे ठेवल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी *(पान २ वर)*

ट्रेड डील, टॅरिफ कपातीनंतर भारत अमेरिकेच्या टार्गेटवर चीन, 'क्वाड' वर होणार मोठी घोषणा

वॉशिंग्टन दि. ३ : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत ावर लादलेले ५० टक्के आयात शुल्क (टॅरिफ) आता १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्याची घोषणा केली आहे. भारताचा अमेरिकेशी व्यापार करारही झाला आहे. यामुळे दोन्ही देशांमधील गेल्या एका वर्षांपासून सुरू असलेला तणाव कमी होण्याची चिन्हे दिसत आहेत. या सगळ्या घडामोडींमध्ये, भारत आणि अमेरिका यांच्यातील मैत्री दृढ होण्याची शक्यता आहे. याचे श्रेय अमेरिकेचे नवे राजदूत सर्गियो गोर यांना दिले जात आहे. सर्गियो गोर हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे अत्यंत जवळचे मानले जातात. सर्गियो गोर यांनी 'क्वाड' या गटाबद्दल असे काही विधान केले आहे, ज्यामुळे चीनला थेट इशारा मिळाला आहे.

चीनची दादागिरी रोखणार

'क्वाड'च्या भविष्याबद्दल उपस्थित केल्या जाणाऱ्या प्रश्नांवर इंडिया टुडेला दिलेल्या एका मुलाखतीत सर्गियो गोर म्हणाले की, हा गट (क्वाड) कुठेही जाणार नाही. त्यांनी सांगितले की, अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी पदभार स्वीकारल्यानंतर लगेचच 'क्वाड' देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक घेतली होती. गोर यांनी पुढे सांगितले की, आमच्या अनेक योजना आहेत, ज्यांची घोषणा मी आत्ताच करणार नाही. 'क्वाड' हा गट चीनची हिंद-प्रशांत महासागर क्षेत्रात वाढती दादागिरी रोखण्यासाठी तयार करण्यात आला आहे. या 'क्वाड' गटात भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया हे सदस्य देश आहेत.

चीनची दहशत अन् क्वाडचं महत्त्व

विशेष म्हणजे, २०२५ मध्ये 'क्वाड' देशांच्या सर्वोच्च नेत्यांची बैठक भारतात होणार होती, पण ती होऊ शकली नाही. आता व्यापार करार (ट्रेड डील) झाल्यानंतर सर्गियो गोर यांच्या विधानामुळे अशी आशा आहे की, लवकरच 'क्वाड'ची शिखर बैठक भारतात होऊ शकते. भारतीय परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर सध्या अमेरिकेत आहेत आणि असे मानले जात आहे की, 'क्वाड'बद्दल त्यांची अमेरिकेतील नेत्यांशी चर्चा होईल. चीन ज्या पद्धतीने हिंद-प्रशांत क्षेत्रातील देशांना दहशतीखाली ठेवण्याचा प्रयत्न करत आहे, त्यामुळे 'क्वाड'ला अधिक मजबूत करण्याची मागणी जोर धरत आहे.

भारत-अमेरिका व्यापार करारातून भारताला काय मिळणार?

पीयूष गोयल यांनी दिली महत्वाची माहिती

नवी दिल्ली दि. ३ : भारत आणि अमेरिकेतील बहुप्रतिक्षित व्यापार करारावर आज अखेर शिक्कामोर्तब झाला. केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी मंगळवारी या कराराची औपचारिक घोषणा केली असून, त्यांनी या कराराला भारताच्या उज्ज्वल भविष्याला चालना देणारा ऐतिहासिक टप्पा म्हटले आहे. या कराराअंतर्गत अमेरिकेने भारतीय वस्तूंवरील आयात कर ५० टक्क्यांवरून थेट १८ टक्क्यांपर्यंत कमी केला आहे. यामुळे चीन, इंडोनेशिया, व्हिएतनाम आणि बांगलादेशसारख्या प्रादेशिक निर्यात प्रतिस्पर्ध्यांच्या तुलनेत भारताला मोठी आघाडी मिळणार आहे.

पीयूष गोयल म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली अंतिम करण्यात आलेली ही डील आपल्या शेजारी देशांच्या तुलनेत भारतासाठी सर्वाधिक फायदेशीर आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून आमची टीम सातत्याने चर्चा करत होती. अनेक गुंतागुंतीचे विषय आणि अडचणी होत्या. भारतावर ५० टक्के टॅरिफ लावण्यात आले होते, ज्याचा सर्वांनाच फटका बसत होता. मात्र, मैत्रीच्या आधारावर आणि राष्ट्रीय हिताला प्राधान्य देत *(पान २ वर)*

लाडकी बहीण योजनेला अजित पवार यांचे नाव द्या : अमोल मिटकरी

मुंबई दि. ३ : राज्याचे उमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारीला विमान अपघातात निधन झाले. त्यांच्या निधनानंतर संपूर्ण महाराष्ट्रात शोक व्यक्त होताना दिसत आहे. दरम्यान. अजित पवार यांच्या निधनानंतर राज्य सरकारी महत्वकांशी असलेली लाडकी बहिण योजनेला अजितदादा पवार यांचे नाव देण्याची मागणी होत आहे. राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी ही मागणी केली आहे. यावर मंत्री पंकजा मुंडे यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. या योजनेला अजितदादा पवारांचे नाव देण्याबाबतच्या मागणीवर मुख्यमंत्री निर्णय घेतील. त्याला आमचे समर्थन राहिल, अशी प्रतिक्रिया पंकजा मुंडे यांनी दिली आहे. लातूर जिल्ह्यातील किनगाव येथे जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारार्थ आयोजित सभेनंतर त्या माध्यमाशी बोलत होत्या.

अजित पवार यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या 'लाडकी बहीण' योजनेला 'अजित दादांची लाडकी बहीण' असं नाव द्यावं, अशी मागणी आमदार अमोल मिटकरी यांनी केली आहे. अजित पवार यांच्या स्मृती लाडक्या बहिणींच्या मनात कायम जपल्या जाव्यात, या उद्देशाने ही मागणी करण्यात आली असून, ही एक प्रकारची आदरांजली असल्याचं मिटकरी यांनी स्पष्ट केलं आहे. तसंच, ही योजना खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावी यासाठी आवश्यक असल्यास योजनेत काही बदल करावेत, अशी मागणीही त्यांनी केली आहे. दरम्यान, ही मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे मांडणार असल्याचं *(पान २ वर)*

सुनेत्रा अजित पवार! मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील कार्यालयात लागली पहिल्या महिला उपमुख्यमंत्र्यांच्या नावाची पाटी

मुंबई दि. ३ : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं २८ जानेवारी रोजी अपघाती निधन झालं. तर, २९ जानेवारी रोजी बारामतीतील विद्याप्रतिष्ठान येथील मैदानात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अजित पवारांच्या अपघाती निधनामुळे संपूर्ण राज्यातून हळहळ व्यक्त करण्यात आली. या आकस्मिक निधनानंतर राज्यात तीन दिवसांचा दुखवटाही पाळण्यात आला. तर, चौथ्या दिवशी अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. तर, आज मंत्रालयात अजित पवारांच्या दालनाबाहेर सुनेत्रा पवारांच्या नावाची पाटी लागली आहे.

मंत्रालयात मुख्य इमारतीच्या सहाव्या मजल्यावर मुख्यमंत्र्याचे दालन तसेच *(उर्वरीत पान २ वर)*

केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा देणाऱ्या शिक्षकांना निवडणूक कर्तव्यातून सूट; राज्य निवडणूक आयोगाचा निर्णय

मुंबई दि. ३ : 'केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा' (सी-टीईटी) देणाऱ्या शिक्षकांना जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या कर्तव्यातून सूट देण्यात आली असून, तसे निर्देश सर्व संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत. राज्य निवडणूक आयोगानं जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी ५ फेब्रुवारीला मतदानाची तारीख निश्चित करुन शिक्षकांना निवडणुकीच्या कामासाठी ड्युटी लावली होती. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळं तारखांमध्ये बदल करण्यात आला. यामुळं केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा देणाऱ्या शिक्षकांसमोर अडचण निर्माण झाली होती.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आल्यानंतर १२ जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठीच्या मतदानाच्या तारखेत बदल करण्यात आला. त्यानुसार आता ५ फेब्रुवारी २०२६ ऐवजी आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. त्याच वेळी राज्यातील काही शिक्षकांची सी-टीईटी परीक्षा असल्यामुळे संबंधित शिक्षकांना निवडणूक कर्तव्यातून सूट देऊन, पर्यायी व्यवस्था करण्याबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाला सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार १५ फेब्रुवारीपर्यंत महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम पार पाडायचा आहे. राज्य निवडणूक आयोगानं १२ जिल्हा परिषद आणि १२५ *(उर्वरीत पान २ वर)*

'टीईटी'चा निकाल ११.२८ टक्के

पुणे दि. ३ : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेचा (टीईटी) निकाल जाहीर करण्यात आला. परीक्षेत ५० हजार ३६९ उमेदवार पात्र ठरले असून, यंदाच्या निकालात सात ते आठ टक्क्यांनी मोठी वाढ झाली आहे.

परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे निकालाची माहिती दिली. परीक्षा परिषदेतर्फे २३ नोव्हेंबर रोजी टीईटी परीक्षा आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेसाठी ४ लाख ७५ हजार ६६९ उमेदवारांनी नोंदणी केली होती. ४ लाख ४६ हजार ७३० उमेदवारांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. त्यापैकी ११.२८ टक्के म्हणजेच ५० हजार ३६९ उमेदवार पात्र ठरले आहेत. परीक्षेची अंतरिम उत्तरसूची १९ डिसेंबर रोजी, तर अंतिम उत्तरसूची १२ जानेवारी रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. परीक्षेतील पेपर १ दिलेल्या १ लाख ९० हजार ९०२ उमेदवारांपैकी २१ हजार ८९२ उमेदवार पात्र ठरले. तर पेपर २ दिलेल्या २ लाख ५५ हजार ८२९ उमेदवारांपैकी २८ हजार ४७७ उमेदवार पात्र ठरले आहेत.

आजवर टीईटीमध्ये पात्र ठरण्याचे सरासरी प्रमाण ३.५ टक्के आहे. आतापर्यंत सर्वाधिक निकाल *(उर्वरीत पान २ वर)*

माहोल....

या दुःखामुळे दोन पॅक अजून लावावे लागतील...